## दिनांक १०/०९/२०२२ रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल (भाग १ ते ५) अमरावती शहर

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | बडनेरा | अप.नं. ७२१/२०२२ कलम ३०५, ३०६ भा. दं.वि. | अल्पवयीना मुलास आत्महत्येस प्रवृत्त | निरंक | अमरावती | दि. ०८.०९.२०२२ चे १८.०० वा. ते १९.१५ वा. दरम्यान. | दि. ०९.०९.२०२२ चे ११.२४ वा. | एक महीला | एक महीला | पो.नि. बाबाराव अवचार, मपोउपनि. सुषमा आठवले<br><br>वेळ - ११.३० वा ते १२.०० वा. | हकीकत अशाप्रकारे आहे की, फिर्यादीचा मुलगा हा तखतमल इंग्लिश हायस्कुल, साईनगर येथे ८ व्या वर्गात शिकत होता. दि. ०८.०९.२२ चे संध्याकाळी ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी डी मार्ट मध्ये किराणा सामान आणण्याकरिता गेल्या त्यावेळी तिचा मुलगा हा घरी अभ्यास करीत होता. किराणा घेऊन फिर्यादी परत आल्या व त्यांनी मुलाला दार उघडण्याकरिता आवाज दिला असता त्याने दार उघडले नाही. त्याचेकडुन कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. फिर्यादीने मुलाच्या मोबाईलवर फोन केला असता त्याने फोन रिसिव्ह केला नाही. म्हणुन फिर्यादीने आत जाऊन पाहीले असता घराचे मुख्य दार अर्धे उघडे दिसले. ते लोटुन आतमध्ये गेली असता तिला मुलगा हॉलमधील सिलिंग फॅनला पांढ-या दोरीचा गळफास घेऊन लटकलेला दिसला. फिर्यादीने आरडाओरड केली परंतु शेजारील कोणीही तिच्या मदतीस धावले नाही. म्हणुन फिर्यादीने तिची पुणे येथे इंजिनियरिंग करिता शिकत असलेली नातेवाईक हिला फोन करून सांगितले. तिचे सांगणेप्रमाणे फिर्यादीने चाकुने मुलाच्या गळयात अडकलेली दोरी कापुन त्यास खाली उतरविले. तसेच फिर्यादीने तिचा भाऊ यास माहीती दिली. मुलाला ऑटोत टाकुन रिम्स हॉस्पिटल येथे नेले असता डॉक्टरांनी त्याला तपासुन मृत घोषीत केले. मुलगा हा खेळण्यासाठी वापरत असलेला क्युब च्या वर सेलो टेपने चिटकविलेली चिठ्ठी फिर्यादीस दिसली. त्यावर मुलाच्या हस्ताक्षरात इंग्रजीत लिहलेले होते. ती चिठ्ठी फिर्यादीची नातेवाईक हिने वाचली असता त्या चिठ्ठीत लिहले होते की, फि.चा मुलगा हा त्याच्या मित्राला भेटायला गेला व मित्राला भेटला असता आरोपी तेथे आल्या व त्यांनी फि.च्या मुलाला तेथेच मारले व वर्गखोलीच्या बाहेर काढुन शिक्षा केली. त्यामुळे वर्गातील इतर विद्यार्थी फि.च्या मुलावर हसत होते. त्यांनी फि.च्या मुलाची मजाक उडविली. या गोष्टीचे फि.च्या मुलाला वाईट वाटले व सहन सुध्दा करू शकला नाही. करीता मी |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | आत्महत्या करीत आहो.<br>वरून आरोपीने फिर्यादीच्या मुलास दिलेल्या अपमानास्पद वागणुकीमुळे शाळेतील इतर मुले त्याच्यावर हसली व हा अपमान तो सहन करू शकला नाही. मुख्याध्यापिकेने केलेल्या अपमानास्पद कृत्यामुळे फिर्यादीचा मुलगा याने गळफास घेऊन आत्महत्या केली. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| २ | फ्रेजरपुरा | अप क्र. ६०४/२०२२ कलम ३२४, ३२५ भादवी | मारहान | - | अमरावती | दि. ०८/०९/२०२२ चे २२/०० वा. | दि. ०९/०९/२०२२ चे १४.३७ वा | एक महीला | सविनदास पुस्तक भोसले रा. र अमरावती | सपोउपनि अजय मोरे ब.नं. ९७३ पोस्टे फ्रेजरपुा अमरावती शहर दि. ०९/०९/२०२२ चे १४०० वा | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व आरोपी नातेवाईक असुन नमुद घ.ता,वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी नातेवाईकासह राहत असुन आरोपी हा नेहमी दारु पिण्यासाठी फिर्यादीला पैसे मागत होता फिर्यादीने पैसे देण्यास नकार दिल्याचे कारणावरुन आरोपी याने फिर्यादीला काठाने व लाथाबुक्यी उजवे बाजुने कमरेवर पाठीवर मारहान केली व आरोपी याने फिर्यादीला उचलुन जमीनीवर आपटले त्यामुले फिर्यादीचे डाव्या हाताला मुका मार लागला असा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट व मेडीकल सर्टिफीकेट व एक्सरे रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ३ | फ्रेजरपुरा | अप क्र. ६०५/२०२२ कलम ३२४ भादवी | काठीने माारहान | | कल्यान नगर साहिल पानठेल्या समोर अमरावती | दि. ०९/०९/२०२२ चे ०९/३० वा ते १०/०० वा दरम्यान | दि. ०९/०९/२०२२ चे १४/५२ वा | प्रज्वल गणेशदास काटगडे वय २२ वर्ष धंदा् मजुरी री. कल्याण नगर अमरावती गल्ली नं, ८ अमरावती | सागर पवार अंदाडे २८ वर्ष रा. मुदलीयार नगर गल्ली नं, ३ पवार मार्केट अमरावती | सपोउपनि अजय मोरे ब.नं. ९७३ पोस्टे फ्रेजरपुा अमरावती शहर दि. ०९/०९/२०२२ चे १५०० वा | हकीकत अशा प्रकारे आहे की,वरील नमुद ठिकाणी फिर्यादी हे आरोपीच्या घराच्या काही अंतरावर राहत असुन तीन ते चार महिन्यापुर्वी फिर्यादीचा मित्राचा व आरोपीचा वाद झाला होता त्या कारणावरुन आरोपी हा फिर्यादीचा राग करीत होता . नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी फिर्यादी त्यांचेच घराचे बाजुला काही अंतरावर पान सेंटर जवळ बसला असतांना यातील आरोपी याने जुन्या वादाचे कारणावरुन फिर्यादीस काठीने डोक्यावर मारुन जखमी केले अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्च व मेडीकल सर्टीफिकेट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ४ | फ्रेजरपुरा | अप.न. 606/2022 कलम302,34 भा.द.वि. | खुन | - | अमरावती | दि.08/09/2022 चे 10.00वा के 18.00वा | दि.09/09/2022 चे 17.41वा | एक महीला | एक महीला | पो.उप.नि.राठोड पो.स्टे.फ्रेजरपुरा अमरावती शहर दि.09/09/2022 चे 17.41वा ते 18.30वा प्राथमीक तपासी अधी म.स.पो.नि सोनाली मेश्राम | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फीर्यादी हीची नातेवाईक रा. अमरावती हीचे नातेवाईक सन 2020 मधे मयत झाल्याने तीचे तीन मुलीसह राहत होती फीर्यादी ची मयत नातेवाईक हीला तीचे सासरचे लोकांकडुन मानसीक व शारीरीक त्रासाबाबत ती नेहमी फीर्यादीस सांगत असे दि.08/09/2022 चे सायंकाळी 06.00 वा फीर्यादीने मयत नातेवाईक हीच्या मोबाईलवर फोन केला असता तीची मुलगी फोन उचलुन सांगीतले की तीची आई मेली आहे व तीला पोलीसांनी उचलुन इर्वीन दवाखाना येथे नेले आहे |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | पो.स्टे.फ्रेजरपुरा अमरावती शहर मो. 9004661263 | वरुन फीर्यादीने तीचे नातेवाईक सोबत इर्वीन दवाखाना येथील पोस्ट मार्डम रुम धे जावुन तीची नातेवाईक हीचे प्रेत पाहीले असता तीला तीचे शरीरावरील डावे डोळ्यावर ओठावर मार लागुन सुज आल्या सारखे दिसले तसेच तीचे डावे हाताचे ढोपरावर उजव्या पायाचे गुडघ्या जवळ मार दीसुन आला मयत हीची नातेवाईकाने फीर्यादीस सांगीतले की तीची नातेवाईकाने विषारी औषध प्राशन करुन आत्महत्या केली आहे परंतु फीर्यादीस तीचे नातेवाईकाचे अंगावर माराचे निशान दीसल्याने तिला आरोपी क्र.1,2,3 यांनी वाद करुन जिवाने ठार मारले आहे असा दाट संशय आहे असे फीर्यादीचे लेखी तक्रार वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |
| ५ | पो.स्टे. गाडगे नगर अमरावती | अप. क्र. १०४९/२०२२ कलम ३४१,१८६, १८९,५०४, ५०६ भा.द.वि. सहकलम १०२,११७,११० ,११२,११७ मपोका | लोकसेवक सार्वजनिक कार्य पार पाडत असतांना त्याला अटकाव करणे | -- | पंचवटी चौक रुरल कॉलेज टर्नींग अमरावती | दि. ०७.०९.२०२२ चे १८.३० | दि. ०९.०९.२०२२२ चे ०२.०५ वा. | सरतर्फे मपोका यादव वय ३४ वर्ष नोकरी शवाशा पुर्व अमरावती | अश्वीन टीपरे रा. सावरखेडा ता. भातकुली जि अमरावती | पो.उपनि राजु जढाळे सोबत पो. स्टे. पो. स्टाफ गाडगे नगर अमरावती<br><br>दि. ०९.०९.२०२२ चे ०२.०५ वा. ते ०२.३० वा. | हकीगत अशा प्रकारे आहे कि, नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे शासकीय सेवेत पोलीस दलात कार्यरत असून सध्या शवाशा पुर्व येथे कार्यरत आहे. ते नमुद घतावेळी व ठीणी कर्तव्य बजावत असताना आरोपीने स्वताचे वाहन रस्त्याचे मध्ये उभे करुन वाहतुकीस अडथळा निर्माण केला. त्यामुळे चौकातील वाहतुक खोळंबली फीर्यादी यांनी आरोपीस गाडी काढून घेण्यास सांगितले असता त्याने फीर्यादीला स्वताचा फोन दिला. व बोलण्यास सांगितले फीर्यादीने बोलण्यास नकार दिला असता फीर्यादीने सोबत आरोपीने वाद सुरु केला व शिवीगाळ करुन पाहून घेण्याची धमकी दिली. अशा फिर्यौदीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ६ | पो.स्टे. गाडगे नगर अमरावती | अप. क्र. १०५०/२०२२ कलम २७९,१८६, १८९,३४१ भा.द.वि. सहकलम ६५ इ प्रो ॲक्ट सहकलम १८४, ३(१),१८१ एम व्ही ॲक्ट | लोकसेवक सार्वजनिक कार्य पार पाडत असतांना त्याला अटकाव करणे | .. | गाडगेबाबा समधी समोर अमरावती | दि. ०८.०९.२०२२ चे २३.३० पावेतो | दि. ०९.०९.२०२२२ चे ०४.२९ वा. | सरतर्फे पोका गोफणे ब न १६४७पो स्टे गाडगे नगर अमरावती | १. सुमीत मोहन राउत वय २७ वर्ष रा. रहाटगाव, २. पवन नीचत रा. अर्जुन नगर ३. वैभव किशोर साबळे वय २८ वर्ष रा. साई मंदीर अमरावती | पो.उपनि राजु जढाळे सोबत पो. स्टे. पो. स्टाफ गाडगे नगर अमरावती<br><br>दि. ०९.०९.२०२२ चे ०४.३० वा. ते ०५.०० वा. | हकीगत अशा प्रकारे आहे कि, नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे शासकीय सेवेत सरकारी वाहन क्र. एम एच २७ ०९ २५६१ हे नमुद घतावेळी व ठीकाणी जात असता नमुद आरोपी भरधाव वेगाने बेदरकारपणे त्या हयगयीने ज्यामुळे फीर्यादी व त्यासोबत असलेला सैनिक त्याच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा पध्दतीने त्याची हातातील गाडी नमुद फीर्यादी चे अंगावर कर्तव्य करत असताना आणली व फीर्यादी व त्याचा पाटनर खाली पडले व एक १८० मिली ची पावटी मिळून आली व सोबत असलेला इसम फीर्यादीचे अंगावर आला व मनसेचे पदाधीकारी चा धाक दाखवला अशा फीर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | करुन तपासात घेतला. सदर आरोपी हे गाडी सोडून निघुन गेले व रहदारीत अडथळा निर्माण झाला व सोबत कर्म मदत घेवून सदर आरोपीचे गाडीची पाहणी केली असता आरोपीची गाडी क्र एम एच ०२ बी बी ११७७ मधून मधून एक १८० मिली ची पावटी मिळून आली व सोबत असलेला इसम फीर्यादीचे अंगावर आला व मनसेचे पदाधिकारी चा धाक दाखवला. अशा फिर्योदीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ७ | पो.स्टे. गाडगे नगर अमरावती | अप. क्र. १०५१/२०२२ कलम ३५४(ड), ५०४, ५०६(ब) भा.द.वि. | विनयभंग करणे | --- | अमरावती | दि. ०९.०९.२०२२ चे १२.०० वा. | दि. ०९.०९.२०२२ चे १६.५६ वा. | एक महीला | अक्षय विक्रम बिबे रा. बिड | सपोनि प्रमोद साळोखे सोबत पो. स्टे. पो. स्टाफ गाडगे नगर अमरावती दि. ०९.०९.२०२२ चे १७.०० ते १७.३० वा. | हकीगत असा प्रकारे आहे कि, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी नामे अक्षय विक्रम बिबे यांच्या सोबत फिर्यादीचे लग्नाअगोदर पुणे येथे ओळख झ ाली त्याने फि. चा मो.नं. घेवुन फि. सोबत त्याचे प्रेम प्रकरण सुरु झाले नंतर फिर्यादीचे लग्न झाल्यावर फिर्यादीला आरोपीने त्याचा मो.नं. वरुन फिर्यादीस व तिच्या नातेवाईकांना फोन करुन शिवीगाळ करुन त्यांच्या कुटुबियांना मारन्याच्या धमक्या दिल्या व स्वता मरन्याचा धमक्या दिल्या नमुद आरोपीने फि. चा मोबाईल फोनवर पाठलाग करुन विनयभंग केला. अशा फिर्योदीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ८ | पो.स्टे. गाडगे नगर अमरावती | अप. क्र.१०५५/२०२२ कलम ३७९ भा.द.वि. | चोरी करणे | हिरोहोंडा स्पेन्डर लाल रंगाची जिचा क्र MH२७-M-३९६१ इंजीन नं. १०००५, चेचीस नं. १०३७० कि.अं. २०,०००/- रु. | सी.टी.सेंटर समोर उडाणपुला खाली पंचवटी चौक अमरावती | दि. ०७.०९.२०२२ चे १९.३० वा. | दि. ०९.०९.२०२२ चे २०.३४ वा. | शुभम देवसु सराटे वय २४ वर्ष, रा. जयभवानी कॉलनी मार्डी रोड राजुरा नाका अमरावती | अज्ञात | सपोनि प्रमोद साळोखे सोबत पो. स्टे. पो. स्टाफ गाडगे नगर अमरावती दि. ०९.०९.२०२२ चे २०.४० ते २१.१० वा. | हकीगत अशा प्रकारे आहे कि, नमुद घटना ताी. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे MPSC स्पर्धा परिक्षेची ट्युशन करिता चाणक्य फाऊंडेशन सी.टी. सेंटर समोर उडाणपुलाखाली उभी करुन क्लासला गेले क्लास करुन परत आले असता त्यांनी ठेवलेली हिरोहोंडा स्पेन्डर लाल रंगाची जिचा क्र MH२७-M-३९६१ इंजीन नं. १०००५, चेचीस नं. १०३७० कि.अं. २०,०००/- रु. दिसुन आली नाही आजुबाजुला शोध घेतला मिळुन आली नाही कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली अशा फिर्योदीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ९ | पो.स्टे. गाडगे नगर अमरावती | अप.क्र. १०५६/२२ कलम २७९, ३३८ भा.द.वि. | वाहण भरधाव वेगाने निष्काळज ीपणे चालवुन अपघात घडवुन | | अमरावती | दि. ०९.०९.२०२२ चे १३.३० वा. | दि. ०९.०९.२०२२ चे २१.५० वा. | एक महीला | वाहण क्र. MH२७-BZ-४४८६ महेन्द्र एक्स व्ही. पांढ-या रंगाची गाडी जोगेन्द्र रामेश्वरम मोहोड वय ३४ वर्ष, रा. बोरगाव | सपोनि प्रमोद साळोखे सोबत पो. स्टे. पो. स्टाफ गाडगे नगर अमरावती दि. | हकीगत अशा प्रकारे आहे कि, नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिार्यादी व तिचा मुलगा सह घेवुन मोटर सायकल ने जात असता बाजुने चारचाकी वाहण क्र एम.एच २७-बीझेड-४४८६ महेन्द्र एक्स व्ही. पांढ-या रंगाची गाडी आल्याने फि चे मोटर सायकलची धडक लागली व फिर्यादी व फिर्यादीचा मुलगा खाली पडला या अपघातामध्ये फि. चे ओठाला मार लागल्याने समोरचे दात तुटले पाठीला व कमरेला मुका मार लागला तसेच |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अपघात करणे | | | | | | धर्माळे पो.स्टे. नादंगाव पेठ | ०९.०९.२०२२ चे २२.०० ते २२.३० वा. | मुलाला डाव्या बाजुने डोक्याला मार लागला त्या गाडीचे चालकाने डॉ.बनकर हॉस्पीटल शेगाव नाका येथे उपचाराकरिता आणले वाहणाकरिता चालकाला विचारले असता त्याने त्याचे नाव जोगन्द्र रामेश्वरराव मोहोड वय ३४ वर्ष, रा. बोरगाव धर्माळे असे सांगीतले सदरचे वाहण चालकाने आपले वाहण भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन अपघात घडवुन आला अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| १० | राजापेठ | अप क्र ७७२/२२ कलम ४५२,३५४ (अ),३५४(क) ५०६ भांदवी | विनयभंग | -- | अमरावती . | दि ०९/०९/२०२२ चे ००/०० वा ते ०१/०० वा दरम्यान | दि ०९/०९/२०२२ चे ०३/४१ वा | एक महीला | राम विठ्ठलराव मडावी रा अमरावती | परी.पोउपनी.सागर ठाकरे पो.स्टे राजापेठ अम शहर<br><br>दि ०९/९/२२ चे ०१/४५ ते ०२/३० वा पावेतो. | हकीकत अशा प्रकारे आहे कि,यातील फिर्यादी हीला शुगरची बिमारी असल्याने घरात होते म्हणुन नमुद घटना ता वेळी व ठिकाणी फि हि साडी सोडुन ब्लाउज आणी पेटीकोटवरच झोपली असतांना नमुद आरोपीने फि चे घराची दरवाज्याची कुंडी उघडुन घरात घुसला व त्याचा पँन्ट काढुन फि जवळ जावुन झोपला व फि हिला धक्का लागल्यावर जाग आला तर फि ओरडली त्यामुळे फि.चे नातेवाईक उठले व दोघानीही त्यास पकडुन ठेवुन डायल ११२ वर कॉल करून पोलीस आले . त्यांनी पोस्टेला आरोपीला आणले आरोपीच्या कृत्यामुळे फिस लज्जा उत्पन्न होवुन फि चे एकांतवासाचा भंग झाला .अशा फि.चे जबाणी रि.वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला आहे. |

## दिनांक १०/०९/२०२२ रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल (भाग १ ते ६) अमरावती शहर

| अ.क्र . | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | मिळालेला / जप्त माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | राजापेठ | अप क्र ७७३/२२ कलम १३५ म वि अ | विज चोरी | ---- | गोविंद नगर राजापेठ अमरावती | दि २७/०६/२०२२ चे ११/४५ वा | दि ०९/०९/२०२२ चे १४/४६ वा | श्रीकांत कमलाकर देशमुख (अती कार्यकारी अभीयंता) वय ५३ वर्ष रा भरारी पथक विद्युतभवन शिवाजी चौक अमरावती | विनय श्रीरंग दातेराव वय ३४ वर्ष रा गोविंद नगर राजापेठ अमरावती | पोउपनि राहुल महाजन सा पोस्टे राजापेठ<br>दि ०९/०९/२०२२ चे १३/०० ते १४/०० वा दरम्यान | हकीकत अशा प्रकारे आहे कि पोस्टेला फि यांनी लेखी फिर्याद दिला की, ते भरारी पथक अमरावती ा (अती कार्यकारी अभीयंता) म्हणुन ड्युटी करतांना नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपीचे विद्युत मिटर तपासणी केली असता मीटर नसलेल्या कायमस्वरूपी खंडीत असलेल्या विज ग्राहक क्र ३६६४७८४०५१४१ यांच्या सव्हीस वायरवर एका के पी टी सी वायरद्वारे डायरेक्ट दुक(आकोडा) टाकुन अनाधीकृत पमे स्वताच्या फायद्याकरीता हेतु परस्पर विजेचा वापर करीत विज चोरी करत असल्याचे दिसुन आले अशा रीपोर्ट वरून गुन्हा सदरचा दाखल करून |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | तपासात घेतला |

## दिनांक १०/०९/२०२२ रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल (जुगार) अमरावती शहर

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | मिळाला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

## दिनांक १०/०९/२०२२ रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल (प्रोव्हीबीशन) अमरावती शहर

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | मिळाला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | फ्रेजरपुरा | 607/2022 कलम 65(ई) म.दा.का. | अवैद्य दारु विक्री | १४ लीटर गावठी हातभट्टी ची दारु कि.अ.2800/- रु.चा प्रोव्ही माल | आरोपी महीला हीचे राहते घरासमोर बिच्छु टेकडी अमरावती | दि.09/09/2022 चे 17.25वा | दि.09/09/2022 चे 19.19वा | सरतर्फे पो.हे.का. योगेश श्रीवास ब.न.1015 पो.स्टे.फ्रेजरपुरा अमरावती शहर | **एक महीला** | पो.उप.नि.राठोड पो.स्टे.फ्रेजरपुरा अमरा्वती शहर दि.09/09/2022 चे 19.19वा ते 1940वा तपासी अधी - पो.हे.का. योगेश श्रीवास ब.न.1015 पो.स्टे.फ्रेजरपुरा अमरावती शहर | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद फीर्यादी हे मा.व.पो.नि.सा.यांचे आदेशाने पो.्स्टे फ्रेजरपुरा हद्दीत डी.बी.पथकातील कर्मचारीसह पेट्रोलींग करीत असता गुप्त बातमीदाराकडुन खबर मिळाल्यावरुन नमुद घ.ता.वेळी व ठीकानी आरोपी महीला हीचे वर प्रो.रेड केला असता पंचासमक्ष तीत्या ताब्यातुन १४ लीटर गावठी हातभट्टी ची दारु कि.अ.2800/- रु.चा प्रोव्ही माल जप्त करण्यात आला नमुद आरोपी महीलेचे कृत्य कलम 65(ई) म.दाका.प्रमाने होत असल्याने सदर चा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |
| २ | फ्रेजरपुरा | 608/2022 कलम 65(ई) म.दा.का. | अवैद्य दारु विक्री | १५ लीटर गावठी हातभट्टी ची दारु कि.अ.3000/- रु.चा प्रोव्ही माल | आरोपी महीला हीचे राहते घरासमोर परिहारपुरा वडाळी अमरावती | दि.09/09/2022 चे 17.55वा | दि.09/09/2022 चे 19.57वा | सरतर्फे पो.हे.का. योगेश श्रीवास ब.न.1015 पो.स्टे.फ्रेजरपुरा अमरावती शहर | **एक महीला** | पो.उप.नि.राठोड पो.स्टे.फ्रेजरपुरा अमरा्वती शहर दि.09/09/2022 चे 19.57वा ते 20.00वा तपासी अधी - पो.हे.का. योगेश श्रीवास | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद फीर्यादी हे मा.व.पो.नि.सा.यांचे आदेशाने पो.्स्टे फ्रेजरपुरा हद्दीत डी.बी.पथकातील कर्मचारीसह पेट्रोलींग करीत असता गुप्त बातमीदाराकडुन खबर मिळाल्यावरुन नमुद घ.ता.वेळी व ठीकानी आरोपी महीला हीचे वर प्रो.रेड केला असता पंचासमक्ष तीत्या ताब्यातुन १५ लीटर गावठी हातभट्टी ची दारु कि.अ.3000/- रु.चा प्रोव्ही माल जप्त करण्यात आला नमुद आरोपी महीलेचे कृत्य कलम 65(ई) म.दाका.प्रमाने होत असल्याने सदर चा |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | ब.न.1015 पो.स्टे.फ्रेजरपुरा अमरावती शहर | गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |
| ३ | पोस्टे गाडगे्नगर अमरावती | अपक्र १०५२/२२ कलम ६५ (ई) मदाका | अवैध दारु विक्री करणे | टँगोपंच कंपनीच्या १६ नग देशी दारु बाँटल १८० एम.एल. च्या मिळुन आल्या , बाँबी संत्रा कंपनीची ०३ देशी दारुच्या काचेच्या बाँटल १८० एम.एल. च्या मिळुन आल्या कि.अं. १४८०/- रु. चा | विलास नगर अमरावती | दि.०९.०९. २०२२ चे १२.५० वा दरम्यान | दि.९.९.२० २२चे १७.२६ वा | पोहेकॉ निळकंठ गवइ बनं १००५ पोस्टे गाडगेनगर अमरावती | एक महीला | सपोनि प्रमोद साळोखे पोस्टे गाडगेनगर अमरावती दि ९.९.२०२२ चे १७.३० वा ते १८.०० वा दरम्यान | हकीकत अशा प्रकारे आहे की फी यांनी दीलेल्या लेखी रीपोंट नुसार गुप्त बातमी दाराकडुन मीळालेल्या खाञीलायक माहीतीवरून यातील नमुद घतावेळी ठीकानी प्रो.रेड केली असता यातील महिला आरोपी सुरेखा अरुण साळुंखे हिच्या ताब्यातुन टँगोपंच कंपनीच्या १६ नग देशी दारु बाँटल १८० एम.एल. च्या मिळुन आल्या , बाँबी संत्रा कंपनीची ०३ देशी दारुच्या काचेच्या बाँटल १८० एम.एल. च्या मिळुन आल्या कि.अं. १४८०/- रु. चा दारु माल मिळुन आल्याने घटनास्थळ जप्ती पंचनाम्याप्रमाणे जप्त करण्यात आल्या अशा र्फीयादीच्या लेखी रीपोंट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला |
| ४ | पोस्टे गाडगे्नगर अमरावती | अपक्र १०५३/२२ कलम ६५ (ई) मदाका | अवैध दारु विक्री करणे | आफीसर ब्लु कंपनीची ४ नग विदेशी बाँटल १८० एम.एल. ची तर ईम्पोरियल ब्लु कंपनीची ४ नग देशी बाँटल १८० एम.एल. आकाराची असा एकुण १६००/- रु. | कपील वस्तु नगर अमरावती | दि. ०९.०९.२० २२ चे १४.०० वा दरम्यान | दि.९.९.२० २२चे १८.४८ वा | पो.ना. आस्तीक देशमुख ब.नं. २०९, पोस्टे गाडगेनगर अमरावती | विरेन्द्र उर्फ विरु विजय किर्तक वय ३४ वर्ष, रा. कपीलवस्तु नगर अमरावती | सपोनि प्रमोद साळोखे पोस्टे गाडगेनगर अमरावती दि ९.९.२०२२ चे १८.५० वा ते १९.२० वा दरम्यान | हकीकत अशा प्रकारे आहे कि, गुप्त बातमी दाराकडुन मीळालेल्या गोपनीय माहीतीच्या आधारे पो. स्टाफच्या मदतीने यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी प्रोव्हीबिशन रेड केली असता यातील दारु पिनारे व दारु विक्री करनारे इसम पोलीसांची चाहुल लागताच पळुन गेले. वरुन सदर ठिकाणी पाहणी केली असता एका कापडी पिशवीमध्ये वेगवेगळया कंपनीची इग्लीश दारुच्या काचेच्या बाँटल दिसुन आल्याने सदर पिशवीमध्ये पाहले वअसता आफीसर ब्लु कंपनीची ४ नग विदेशी बाँटल १८० एम.एल. ची तर ईम्पोरियल ब्लु कंपनीची ४ नग देशी बाँटल १८० एम.एल. आकाराची असा एकुण १६००/- रु. चा माल मिळुन आल्याने घटनास्थळ जप्ती पंचनाम्याप्रमाणे जप्त करण्यात आल्या अशा र्फीयादीच्या लेखी रीपोंट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | पोस्टे गाडगे्नगर अमरावती | अपक्र १०५४/२२ कलम ६५ (ई) मदाका | अवैध दारु विक्री करणे | . १३ नग बॉंबी संत्रा कंपनीची उसाच्या मळीपासुन तयार केलेली देशी दारु बॉंटल १८० एम.एल. आकाराची कि. अं. ९७५/- रु. | कपील वस्तु नगर अमरावती | दि. ०९.०९.२०२२ चे १३.१५ वा दरम्यान | दि.९.९.२०२२चे १९.३५ वा | सरतर्फे पो.ना. गजानन बरडे ब.नं. ९८०, पोस्टे गाडगेनगर अमरावती | प्रफुल सागर वानखडे वय 22 रा कपीलवस्तु नगर अमरावती | सपोनि प्रमोद साळोखे पोस्टे गाडगेनगर अमरावती दि ९.९.२०२२ चे १९.४० वा ते २०.१० वा दरम्यान | हकीकत अशा प्रकारे आहे कि, गुप्त बातमी दाराकडुन मीळालेल्या गोपनीय माहीतीच्या आधारे पो. स्टाफच्या मदतीने यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी प्रोव्हीबिशन रेड केली असता यातील दारु पिनारे व दारु विक्री करनारे इसम पोलीसांची चाहुल लागताच पळुन गेले. वरुन सदर ठिकाणी प्लास्टीक पिशवीची पाहणी केली असता त्यामध्ये १३ नग बॉंबी संत्रा कंपनीची उसाच्या मळीपासुन तयार केलेली देशी दारु बॉंटल १८० एम.एल. आकाराची कि. अं. ९७५/- रु. चा माल मिळुन आल्याने घटनास्थळ जप्ती पंचनाम्याप्रमाणे जप्त करण्यात आल्या अशा फिर्यादीच्या लेखी रीपोंट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला |
| ६ | नागपुरी गेट | अप नं ४५४/२२ कलम ६५ (ई) म प्रोव्ही ॲक्ट | अवैध रित्या देशी दारू विक्री | देशी दारू बॉबी संत्रा कंपनीच्या १८०एम एल च्या २७ नग पावटया पगत्येकी किमंत ७०रू एकुण किंमत १८९०रू | दुसरा नागोबा ओटा जवळ रतनगंज अमरावती | दि.०९.०९.२२ चे १६.२५ ते १७.०० वा | दि.०९.०९.२२ चे १७.५२ वा | सर तर्फे पोहेका अशोक वाटाने ब न १०२३ पो स्टे नागपुरी गेट अमरावती | **एक महीला** | मपोउपनी ज्योती बळेगावे वेळ १८.०० वा | हकिकत अशा प्रकारे आहे कि, गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या खबरेवरुन यातील वर नमुद **एक महीला** हिचेवर फिर्यादी पो स्टाफ यांनी पंचासमक्ष प्रोव्ही रेड केला असता तिचे ताब्यातुन जप्ती पंचनाम्याप्रमाणे तिचे ताब्यात असलेल्या नायलॉन पिशवीतुन देशी दारू बॉबी संत्रा कंपनीच्या १८०२ एम एल च्या २७ नग पावटया पगत्येकी किमंत ७०रू एकुण किंमत १८९०रू चा अवैध माल मिळुन आला अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेंतला |
| ७ | नागपुरी गेट | अप नं ४५५/२२ कलम ६५ (ई) म प्रोव्ही ॲक्ट | अवैध रित्या देशी दारू विक्री | देशी दारू बॉबी संत्रा कंपनीच्या १८०२एम एल च्या २८ नग पावटया पगत्येकी किमंत ७०रू एकुण किंमत १९६०रू | रतनगंज दुसरा नागोबा ओटा अमरावती | दि.०९.०९.२२ चे १७.४० ते १८.१५ वा | दि.०९.०९.२२ चे १८.५० वा | सर तर्फे पोहेका महेन्द्रसिंग येवतीकर ब न ८०४ पो स्टे नागपुरी गेट अमरावती हर | गजानन रघुनाथ भुते वय ४४ वर्ष रा रतनगंज दुसरा नागोबा ओटा अमरावती | मपोउपनी ज्योती बळेगावे वेळ १९.०० वा | हकिकत अशा प्रकारे आहे कि, गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या खबरेवरुन यातील वर नमुद आरोपी गजानन रघुनाथ भुते वय ४४ वर्ष रा रतनगंज दुसरा नागोबा ओटा अमरावती हा जागीच मिळुन आला पंचासमक्ष प्रोव्ही रेड केला असता त्याचे ताब्यातुन जप्ती पंचनाम्याप्रमाणे त्याचे जवळ असलेल्या प्लास्टिक चे पिशवीत देशी दारू बॉबी संत्रा कंपनीच्या १८०२एम एल च्या २८ नग पावटया पगत्येकी किमंत ७०रू एकुण किंमत १९६०रू चा अवैध माल मिळुन आला अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेंतला |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | पो स्टे नांदगाव पेठ | ३२४/२२ कलम ६५ (ई) मदाका | अवैध्य रित्या दारु विक्री | १० नग ९० एम एल बॉबी संत्रा देशी दारुच्य पावट्या कि.अ.४०० रु. प्रो.व्हि चा | रहाटगाव अमरावती | दि. ०९/०९/२०२२ चे ९.०० वा | दि. ०९/०९/२०२२ चे १०.३३ वा | सरतर्फ पोहेका.राजु काळे ब.न. ८५७ पोस्टे नांदगावपेठ अमरावती | धम्मदिप गणेश वानखडे वय ३९ वर्ष रा.नांदगावपठ अमरावती | सरतर्फ पोहेका.राजु काळे ब.न. ८५७ पोस्टे नांदगावपेठ अमरावती दि. ०९/०९/२०२२ चे ९.०० वा पावेतो . दाखल अधी - नापोकाँ देशमुख ब.न. ४३० तपासी अधिकारी - पोहेका. राजु काळे ब.न. ८५७ पोस्टे. नांदगावपेठ अमरावती | हकिकत असा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता. वेळी यातील फिर्यादी यांची सोबत नापोका.१६४ पोका. १५४९, सह पोस्टे. हद्दीमध्ये प्रोव्हिशन रेड ड्युटी असता पैटोलींग करित असतांना ०९.०० वा दरम्यान गुप्त बातमीदाराकडुन खात्रीलायक खबर मिळाली की, एक ईसम रहाटगाव येथे अवैध्यरित्या विनापरवाना देशी दारुची विक्री करित आहे अशा खात्रीलायक खबरे वरु नमुद घटनास्थळी पंचासह प्रो रेड केली असता दारु विक्री करणारा ईसम जागीच मिळुन आला त्याला ताब्यात घेवुन त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव धम्मदिप गणेश वानखडे वय ३९ वर्ष रा. रहाटगाव असे सांगितले त्याचे जवळ असलेल्या कापडी थैलाची पाहणी केली असता त्यामध्ये १० नग ९० एम एल बॉबी संत्रा देशी दारुच्य पावट्या कि.अ.४०० रु. प्रो.व्हि चा माल मिळुन आला.वरुन आरोपीचे कृत्य हे कलम ६५ (ई) मदाका प्रमाणे होत असल्याने फि च्या लेखी फिर्यादवरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ९ | पो स्टे नांदगाव पेठ | ३२५/२२ कलम ६५ (ई) मदाका | अवैध्यरित्या दारुविक्री | १० नग ९० एम एल बॉबी संत्रा देशी दारुच्य पावट्या कि.अ.४०० रु. | कठोरा बु अमरावती | दि. ०९/०९/२०२२ चे १०.०० वा | दि. ०९/०९/२०२२ चे १०.४४वा | सरतर्फ पोहेका.राजु काळे ब.न. ८५७ पोस्टे नांदगावपेठ अमरावती | सिताराम शुकलाल जांभुळकर वय २३ वर्ष रा.नांदगावपेठ अम. | सरतर्फ पोहेका.राजु काळे ब.न. ८५७ पोस्टे नांदगावपेठ अमरावती दि. ०९/०९/२०२२ चे ९.०० वा ते १०.००पावेतो . | हकिकत असा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता. वेळी यातील फिर्यादी यांची सोबत नापोका.१६४ पोका. १५४९, सह पोस्टे. हद्दीमध्ये प्रोव्हिशन रेड ड्युटी असता पैटोलींग करित असतांना १०.०० वा दरम्यान गुप्त बातमीदाराकडुन खात्रीलायक खबर मिळाली की, एक ईसम रहाटगाव येथे अवैध्यरित्या विनापरवाना देशी दारुची विक्री करित आहे अशा खात्रीलायक खबरे वरु नमुद घटनास्थळी पंचासह प्रो रेड केली असता दारु विक्री करणारा ईसम जागीच मिळुन आला त्याला ताब्यात घेवुन त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव सिताराम शुकलाल जांभुळकर वय २३ वर्ष रा.नांदगावपेठ अम. असे सांगितले त्याचे जवळ असलेल्या कापडी थैलाची पाहणी केली असता त्यामध्ये १० नग ९० एम एल बॉबी संत्रा देशी दारुच्य पावट्या कि.अ.४०० रु. प्रो.व्हि चा माल मिळुन आला.वरुन आरोपीचे कृत्य हे कलम ६५ (ई) मदाका प्रमाणे होत असल्याने फि च्या |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | लेखी फिर्यादवरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| १० | सिटी कोतवाली अमरावती श | अप क्र ४५७२०२ २कलम ६५ (ई) मदाका | दारूबंदी | देशीदारू टँन्गो पंच कंपनीच्या ३८ पावट्या प्रत्येकी ९० ML च्या किं अंदाजे १३३०रू<br>२)देशी दारू बाँबी संत्रा पंच कंपनीचा १२ पावट्या प्रत्येकी किं अं ४२० रू असा एकुण १७५० रू चा माल | बसडेपो च्या मागे समाधान चौक अमरावती | दि ०९.०९.०२०२२ चे ११.०० | दि ०९.०९.२०२२ चे १४.४७ वा | स फौ रविंद्र काळे बं न ४९६ पोस्टे सिटी कोतवाली | एक महीला | स फौ रविंद्र काळे बं न ४९६ पोस्टे सिटी कोतवाली दि ०९.०९.२२चे ११.००वा<br><br>दाखल अधिकारी - सपोनि पुजा खांडेकर<br>तपासी अधिकरी सपोनि पुजा खांडेकर<br>मो नं ९७६७९९९६३३ | हकीकत अशाप्रकारे आहे की नमुद घटना ता वेळी यातील फिर्यादी सोबत पो स्टाँफ PC ६४६ १७४४,१७०४,२१७ असे पेट्रोलिंग करीत असातंना ११.०० वा गुप्त बातमीदाराकडुन खात्रीलायक माहिती मिळाली की एक महिला हि बस डेपो चा मागील बाजुला समाधाननगर कडे जाणारा रोड वर अवैधरित्या देशी दारू विक्री करीत आहे असा खबरेवरून आम्ही व सोबत पंचनाम्यातील पंचाना घेवुन खाजगी वाहनाने अमरावती बस डेपो डेपोच्या मागील बाजुला समाधान नगर कडे जाणाररोड च्या बाजुला गेलो असता कचरा कंटनेर जवळ एक महिला आपले हातात नायलाँन पिशवी घेवुन दिसली तिला इशारा देवुन थांबविले व तिचे नाव गाव विचारले असता वरीलप्रमाणे सांगीतले तिचे ताब्याती ल पिशवीची पाहणी केली असता पिशवीत देशीदारू टँन्गो पंच कंपनीच्या ३८ पावट्या प्रत्येकी ९० ML च्या किं अंदाजे १३३०रू<br>२)देशी दारू बाँबी संत्रा पंच कंपनीचा १२ पावट्या प्रत्येकी किं अं ४२० रू असा एकुण १७५० रू चा माल मिळुन आल्याने पंचासमक्ष जप्त करून ताब्यात घेतला सदर मालाचे परवाना बाबत विचारले असता परवाना नसल्याचे सांगीतले सदरआरोपीचे कृत्य कलम ६५ई मदाका प्रमाणे होत असल्याने सदरचा गुन्हा होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला |
| ११ | खोलापुरी गेट | २४२/२०२२ कलम ६५(ई) मदाका | प्रोव्हीशन बाबत | देशी दारु टेंगो पंच कंपनीच्या प्रत्येकी १८० मी ली च्या १३ नग सिलबंद पावट्या किअं.९१० रुपये चा प्रो माल | हनुमान नगर खोलापुरी गेट अमरावती | ०९/०९/२०२२ चे १३/१३ वा ते १४/०० वा दरम्यान | ९/०९/२०२२ चे १५/२२ वाजता | सरतर्फ नापोकाँ मंगेश भिलाये ब.न.२०२ पो स्टे खोलापुरी गेट अमरावती शहर | शेख सलीम शेख बब्बु वय ४६ वर्ष रा हनुमान नगर खोलापुरी गेट अमरावती | नापोकाँ मंगेश भिलाये ब.न.२०२ पो स्टे खोलापुरी गेट अमरावती शहर वेळ ०९/०९/२०२२ चे १३/१३ वा ते | हकीकत अशा प्रकारे आहे कीयातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी मुकबीरचे खबरी प्रमाणे पंच व पो स्टाँपचे मदतीने यातील नमुद आरोपीवर प्रेव्हीशन रेड घातला असता त्याचे ताब्यातुन देशी दारुने भरलेल्या देशी दारु टेंगो पंच कंपनीच्या प्रत्येकी १८० मी ली च्या १३ नग सिलबंद पावट्या किअं.९१० रुपये चा प्रो माल पंचासमक्ष मिळुन आल्याने जप्ती पंचनामा आरोपी व सी.ए.सँम्पलसह पो स्टे ला येवुन आरोपी विरुध्द |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | १४/०० वा दरम्यान | सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| १२ | खोलापुरी गेट | २४३/२०२२ कलम ६५(ई) मदाका | अवैध दारु विक्री | देशी दारु टेंगो पंच कंपनीच्या प्रत्येकी १८० मी ली च्या १२ नग सिलबंद पावट्या कि. अं. ८४० रुपये चा प्रो माल | खोलापुरी गेट झ गोपडपट्टी अमरावती | ०९/०९/२०२२ चे १४-१५ ते १४-४५ वा दरम्यान | ९/०९/२०२२ चे १६-०९ वाजता | सरतर्फ नापोकॉ सुधिर लक्ष्मणराव प्रांजळे ब. न. ९३३ पो स्टे खोलापुरी गेट अमरावती शहर | अमोल सिध्दार्थ मकेश्वर वय ३० वर्ष रा. खोलापुरीगेट झ गोपडपट्टी अमरावती | नापोकॉ सुधिर प्रांजळे ब.न. ९३३ पो स्टे खोलापुरी गेट ०९/०९/२०२२ चे १४-१५ ते १४-४५ वा दरम्यान दाखल अधिकारी ASI विजय पांडे ब. न. १४८४ पो स्टे खोलापुरी गेट अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे कीयातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी मुकबीरचे खबरी प्रमाणे पंच व पो स्टाँपचे मदतीने यातील नमुद आरोपीवर प्रेव्हीशन रेड घातला असता त्याचे ताब्यातुन देशी दारुने भरलेल्या देशी दारु टेंगो पंच कंपनीच्या प्रत्येकी १८० मी ली च्या १२ नग सिलबंद पावट्या कि अं. ८४० रुपये चा प्रो माल पंचासमक्ष मिळुन आल्याने जप्ती पंचनामा आरोपी व सी. ए. सँम्पलसह पो स्टे ला येवुन आरोपी विरुध्द सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| १३ | खोलापुरी गेट | २४४/२०२२ कलम ६५(ई) मदाका | अवैध दारु विक्री | १) रॉयल स्टॅग विस्की ३ नग सिलबंद पावट्या की. ५४० रु. २) ओसी ब्ल्यु कंपनीच्या ४ नग सिलबंद पावट्या की. ६०० रु. ३) हॉही संत्रा देशी दारु ३ नग सिलबंद पावट्या कि. २१० रु. ४ देशी दारु टॅंगो पंच २ नग सिलबंद पावट्या कि. १४० रु. तसचे आरोपीचे अंगझडती मध्ये दारु विक्रीचे एकुण १८०० रु. असा एकुण ३२९० रु. चा माल | खरकाडीपुरा अमरावती | ०९/०९/२०२२ चे १४-५० वा दरम्यान | ९/०९/२०२२ चे १६-५० वाजता | ASI विजय पांडे ब.नं. १४८४ पो. स्टे. खो. गेट अमरावती | अजय रमेस जयस्वाल वय २२ वर्ष रा. खरकाडीपुरा अमरावती | ASI विजय पांडे ब. नं. १४८४ पो. स्टे. खो. गेट ०९/०९/२०२२ चे १४-५० ते १५-३० वा. दरम्यान दाखल अधिकारी ASI विजय पांडे ब. न. १४८४ पो स्टे खोलापुरी गेट अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, मा. पोलीस आयुक्त साहेब यांचे विशेष पथकातील स. पो. नि. योगेश इंगळे हे त्यांचे स्टॉपसह आयुक्तालय हद्दीत अवैध धंद्यावर रेड करणे कामी पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की, खरकाडीपुरा येथील अजय रमेश जयस्वाल हा त्याचे घरी अवैधरीत्या दारु विक्री करीत आहे अशी माहीती त्यांनी पो. स्टे. चे लॅन्डलाईन वरुन डी. ओ. ASI विजय पांडे ब.नं. १४८४ यांना दिल्याने व कार्यवाही करणे कामी बोलाविले असता यातील फिर्यादी पंचासह व पो. स्टॉफ सह घटनास्थळी जावुन स. पो. नि. योगेश इंगळे यांचे स्टॉफसह आरोपीचे घरी जावुन प्रो. रेड केली असता आरोपीचे ताब्यातुन १) रॉयल स्टॅग विस्की ३ नग सिलबंद पावट्या की. ५४० रु. २) ओसी ब्ल्यु कंपनीच्या ४ नग सिलबंद पावट्या की. ६०० रु. ३) हॉही संत्रा देशी दारु ३ नग सिलबंद पावट्या कि. २१० रु. ४ देशी दारु टॅंगो पंच २ नग सिलबंद पावट्या कि. १४० रु. तसचे आरोपीचे अंगझ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | **ाडती मध्ये दारु विक्रीचे एकुण १८०० रु. असा एकुण ३२९० रु. चा माल मिळुन आला तो पंचा समक्ष जप्त करुन ताब्यात घेतला. अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.** |

## दिनांक १०/०९/२०२२ रोजी अकस्मात मृत्यू बाबतचा अहवाल. अमरावती शहर

| अ क्र | पो.ठाणे | अकस्मात मृत्यू क्रमांक व कलम | वारस/ बेवारस | हॉस्पीटल /ठिकाण | मयताचे नांव | वय वर्ष | स्त्री/पुरुष | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ०९ | १० |
| १ | बडनेरा | मर्ग क्र. ५५/२२ कलम १७४ जाफो | वारस<br><br>फिर्यादी<br>अनिल पांडुरंग माहेकर, वय ४८ वर्षे, रा. अंजनगावबारी, अमरावती. | जिल्हा सामान्य रूग्णालय, अम.<br>घटना ता. वेळ - दि. ०९.०९.२२ चे ०८.०० वा.<br>मृत्यु ता. वेळ - दि. ०९.०९.२२ चे ११.३५ वा.<br>दाखल ता. वेळ - दि. ०९.०९.२२ चे १४.२३ वा. | रोशन महादेवराव माहेकर, वय ३२ वर्षे, रा. अंजनगावबारी, अमरावती. | वय- ३२ वर्ष | पुरुष | पो.हे.कां. विजय केवतकर, ब.न. १७ मो. नं. ९१३०४३५९८३ | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील मृतक नामे रोशन महादेवराव माहेकर, वय ३२ वर्षे,, रा. अंजनगावबारी, अमरावती.<br>हा फिर्यादीचा चुलत भाऊ असुन त्याने शेताच्या नापिकीवरून व कर्जबाजारी झाल्यामुळे जिवनाला कंटाळुन घरातील सिलिंग फँनला दोरीने गळफास लावला. त्याला खाली उतरवरून फिर्यादीने व काकाने जिल्हा सामान्य रूग्णालय येथे नेले. तेथे उपचारादरम्यान त्याचा मृत्यु झाला. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरून व मरणाचा मेमो वरून सदरचा मर्ग दाखल करून तपासात घेतला. |
| २ | राजापेठ | ४६/२२ कलम.१७४ जाफौ. | वारस | गेट लाईफ हॉस्पीटल अम<br><br>घटणा ता वेऴ<br>दाखल ता वेऴ<br>दि.०७/०९/२२ चे २१.०० वा.<br>दाखल ता वेऴ-दि. ०९/०९/२२ चे १७.४० वा. | एक महीला | २३ वर्ष | स्त्री | सैनिक मोहन विश्वनाथ हागे बनं.५९३४ पोस्टे फेंजरपूरा | हकीकत अशा प्रकारे आहे कि, आज रोजी आमची दि. ०९/०९/२२ रोजी चे १४.ते २१.०० वा पावेतो ड्यूटी असतांना फेंजरपूरा सैनिक नामे मोहन हागे बनं. ५९३४ यांना मृतक एक महीला हीने रहाते घरी विश प्राशन केले व इलाजादरम्यान गेट लाईफ हॉस्पीटल दवाखाना अम. येथे तिचा दि. ०८/०९/२२ चे १०.२६वा मृत्यू पावली त्यामूऴे फेंजरपूरा पोस्टे ला ००/२२ चा मर्ग दाखल साना असून तो घटनास्थऴ राजापेठ पोस्टेचे असून त्याची मर्ग ची डायरी पोस्टेला आणून दाखल केली तेव्हा मर्ग डायरीमध्ये १) मर्ग डायरी २)मर्ग खबरी फेंजरपूरा ,३) बयाण,४)मेडीकल मेमो , ५)गेट लाईफ हॉसेपीटल मेमो ,६)फेंजरपूरा ठाणे दैनंदिनी ७)इर्वीन पोलीस इनव्हॉल मेमो ,८)विनंती मेमो ,९) प्रश्नोत्तर फॉर्म , १०) इनक्वेस्ट पंचनामा ११)नातेवाईक समन्स ,१२)पंचाना संमन्स ,१३) मेडी. मेमो, १४)प्रेत पावती ,१५)ड्यूटी पास, १६)गेट लाईफचे इलाजादरम्यान मृतकाचेझेरॉक्स कॉपी असे कागदपत्रे असलेली मर्ग डायरी पोस्टेला आणून दाखल करून तपासात घेतला. |

दिनांक 09/09/2022 ते 11/09/2022 रोजीची शासकीय सुट्टी असल्याने मा. सेशन कोर्टात होणा-या प्रकरणांची माहीती निरंक आहे.